# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 20 May 2025

Time 18.10 to 18.20

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – २० मे २०२५ सायंकाळी ६.१०**

****

- राज्याचं नवीन गृहनिर्माण धोरण जाहीर, गृहनिर्माण क्षेत्रात सत्तर हजार कोटी रुपयांची गुंतवणूक येण्याची अपेक्षा
- राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार छगन भुजबळ यांचा आज राज्य मंत्रिमंडळात समावेश
- ज्येष्ठ खगोल शास्त्रज्ञ जयंत नारळीकर आणि अणुऊर्जा आयोगाचे माजी अध्यक्ष डॉक्टर एम. आर. श्रीनिवासन यांचं निधन

आणि

- गडचिरोली इथं पाच नक्षलवादी महिला पोलिसांच्या ताब्यात

****

राज्याचं नवीन गृहनिर्माण धोरण जाहीर करण्यात आलं आहे. आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत याबाबतचा निर्णय घेण्यात आला. 'माझं घर-माझा अधिकार' हे या धोरणाचं ब्रीदवाक्य आहे. या धोरणातून झोपडपट्टी पुनर्वसन ते पुनर्विकास, असा सर्वांगीण कार्यक्रम राबवला जाणार आहे. अल्प उत्पन्नधारक, ज्येष्ठ नागरिक, महिला, औद्योगिक कामगार आणि विद्यार्थी यांच्या विशिष्ट गरजांचा या धोरणात प्राधान्यानं विचार केला असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं. या धोरणातून गृहनिर्माण क्षेत्रात सत्तर हजार कोटी रुपयांची गुंतवणूक येण्याची अपेक्षा आहे. या धोरणाअंतर्गत सर्व प्रकारच्या योजना महाआवासच्या पोर्टलवर आणण्यात येणार असल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

**बाईट – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

बायोमिथेनेशन तंत्रज्ञानाचा वापर करून कॉम्प्रेस्ड बायोगॅस प्रकल्पाची उभारणी करण्यासाठी महानगर गॅस लिमिटेड या कंपनीला मुंबईतल्या देवनार इथला भूखंड सवलतीच्या दरात भाडेपट्ट्यानं उपलब्ध करून देण्याचा निर्णयही मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

उद्योग विभागातला धोरण कालावधी संपुष्टात आल्यामुळे प्रलंबित असलेल्या ३२५ प्रस्तावांना मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. यामुळे एक लाख ६५५ कोटी रूपयांची गुंतवणूक आणि ९३ हजार ३१७ रोजगार निर्मिती होणं अपेक्षित आहे.

****

जागतिक पातळीवर भारत लवकरच सर्वात वेगानं वाढणारी स्टार्ट अप इकोसिस्टीम बनेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला आहे. वैज्ञानिक आणि औद्योगिक संशोधन परिषद – सीएसआयआर च्या, स्टार्ट अप कॉन्क्लेव्ह २०२५, या दोन दिवसीय परिषदेचं उद्घाटन करताना ते आज मुंबईत बोलत होते. नवोन्मेष, सहयोग आणि परिवर्तन, ही या परिषदेची संकल्पना आहे. स्टार्ट अप क्षेत्राला प्रोत्साहन देण्यासाठी राज्य शासनानं हाती घेतलेल्या इनोव्हेशन सिटी आणि एज्युसिटी, अशा योजनांचा उल्लेख करत, देशात महाराष्ट्र राज्य स्टार्ट अपची राजधानी म्हणून उदयाला आल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

****

राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार छगन भुजबळ यांचा आज राज्य मंत्रिमंडळात समावेश करण्यात आला. राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी भुजबळ यांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यावेळी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी छगन भुजबळ यांचा मंत्रिमंडळात समावेश झाल्याबद्दल त्यांचं अभिनंदन केलं. तर, छगन भुजबळ यांच्या अनुभवाचा लाभ राज्याला आणि त्यांना मिळणाऱ्या विभागाला होईल, अशी प्रतिक्रिया उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली आहे.

****

आंतरराष्ट्रीय कीर्तीचे ज्येष्ठ खगोल शास्त्रज्ञ आणि विज्ञान साहित्यिक जयंत नारळीकर यांचं आज पहाटे पुण्यात निधन झालं, ते शहाऐंशी वर्षांचे होते. नारळीकर यांचं

खगोल भौतिकी शास्त्रातलं कार्य जगभरात नावाजलं गेलेलं आहे. त्यांच्या कार्याचा आढावा घेणारा हा संक्षिप्त वृत्तांत –

***जयंत नारळीकर यांनी ब्रिटनमधल्या केंब्रिज इथून डॉक्टरेट आणि रँग्लर या प्रतिष्ठित पदव्या घेतल्यानंतर, १९७२ मध्ये मुंबईत टाटा मूलभूत संशोधन संस्थेच्या खगोलशास्त्र विभाग प्रमुखपदाची जबाबदारी स्वीकारली. १९८८ साली त्यांची पुण्यातल्या इंटर युनिव्हर्सिटी सेंटर फॉर ॲस्ट्रॉनॉमी अँड ॲस्ट्रोफिजीक्स, आयुका या संस्थेचे संचालक म्हणून नियुक्ती झाली. नारळीकर यांना खगोलशास्त्रातल्या कार्यासाठी टायसन मेडल तसंच स्मिथ पुरस्कार असे जागतिक पातळीवरचे सन्मान मिळाले आहेत. डॉक्टर नारळीकर यांनी जगप्रसिद्ध शास्त्रज्ञ सर फ्रेड हॉएल यांच्यासमवेत 'कन्फॉर्मल ग्रॅव्हिटी थिअरी' मांडून जगभरातील शास्त्रज्ञांचं लक्ष वेधून घेतलं. खगोल क्षेत्रातील बहुमूल्य योगदानासाठी त्यांना 'पद्मभूषण' आणि पद्मविभूषण' हे सर्वोच्च सन्मान मिळाले आहेत. नारळीकर यांनी ९४ व्या अखिल भारतीय साहित्य संमेलनाचं अध्यक्षपद भूषवलं होतं. विज्ञान प्रसारासाठी डॉक्टर नारळीकर यांनी अनेक माध्यमांचा वापर केला, त्यात त्यांच्या विज्ञान विषयक लिखाणाचा मोठा भाग आहे. चार नगरांतले माझे विश्व, या त्यांच्या आत्मचरित्राला साहित्य अकादमीचा तर, 'यक्षाची देणगी' या पुस्तकाला महाराष्ट्र सरकारचा पुरस्कार मिळाला असून, याशिवाय देशविदेशातल्या अन्य अनेक पुरस्कारांनी त्यांना गौरवण्यात आलं आहे.***

****

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी डॉक्टर नारळीकर यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या शोक संदेशात, खगोल भौतिकीतलं नारळीकर यांचं महत्वाचं सैध्दांतिक काम येत्या पिढ्यांसाठी मूल्यवान असल्याचं म्हटलं आहे.

राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांनीही नारळीकर यांना श्रद्धांजली वाहिली.

नारळीकर यांचे अंत्यसंस्कार शासकीय इतमामात व्हावेत, असे निर्देश मुख्यमंत्र्यांनी संबंधित यंत्रणेला दिले आहेत.

****

भारताच्या नागरी अणुऊर्जा कार्यक्रमाचे एक आधारस्तंभ आणि भारताच्या अणुऊर्जा आयोगाचे माजी अध्यक्ष डॉक्टर एम. आर. श्रीनिवासन यांचं आज तामीळनाडूत निधन झालं, ते पंच्याण्णव वर्षांचे होते. डॉक्टर श्रीनिवासन यांना भारताच्या नागरी अणुऊर्जा कार्यक्रमाचे शिल्पकार म्हणून ओळखलं जातं. भारताची पहिली अणुभट्टी अप्सरा च्या निर्मितीत डॉक्टर होमी भाभा यांच्यासोबत श्रीनिवासन यांचा सहभाग होता. श्रीनिवासन यांच्या अणुऊर्जा क्षेत्रातल्या अतुलनीय योगदानाबद्दल त्यांना पद्मविभूषण पुरस्कारानं सन्मानित करण्यात आलं होतं.

****

ऑपरेशन सिंदूरच्या गौरवार्थ सातारा शहरात आज तिरंगा रॅली काढण्यात आली. जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी, माजी सैनिक तसंच नागरिक यात सहभागी झाले होते. बुलडाणा शहरात आज सकाळी भाजपा जिल्हाध्यक्ष माजी आमदार विजयराज शिंदे यांच्या नेतृत्वात तर खामगाव शहरात राज्याचे कामगार मंत्री आकाश फुंडकर यांच्या नेतृवात तिरंगा रॅली काढण्यात आली.

****

माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त आणि देशासाठी बलिदान देणाऱ्या शहीद जवानांना अभिवादन करण्यासाठी काँग्रेसतर्फे उद्या छत्रपती संभाजीनगरमध्ये तिरंगा यात्रा काढण्यात येणार आहे. या यात्रेची सुरुवात सकाळी साडेनऊ वाजता शहागंज इथल्या महात्मा गांधी पुतळ्यापासून होणार असल्याची माहिती शहर काँग्रेस कमिटीकडून देण्यात आली.

****

ऑपरेशन सिंदूर हे नव्या भारताचं प्रतीक असल्याचं मत, छत्रपती संभाजीनगर इथल्या सरस्वती भुवन महाविद्यालयाची विद्यार्थिनी, तसंच राष्ट्रीय छात्र सेना – एनसीसी कॅडेट क्रिषिता आगळे हिने व्यक्त केलं आहे. आकाशवाणीशी बोलतांना तिने या कारवाईबद्दल सैन्यदलाचं अभिनंदन केलं. ती म्हणाली –

**बाईट – क्रिषिता आगळे, एनसीसी कॅडेट**

****

अनेक हिंसक कारवायांमध्ये सहभागी राहिलेल्या पाच नक्षलवादी महिलांना गडचिरोली पोलिस आणि केंद्रीय राखीव दलाच्या जवानांनी ताब्यात घेतलं. यातल्या तिघींना अटक करण्यात आली असून, दोन नक्षली अल्पवयीन असल्यामुळे त्यांना बाल न्याय मंडळापुढे हजर करण्यात येणार आहे. गडचिरोली जिल्ह्यात भामरागड तालुक्यातल्या बिनागुंडा परिसरात ही कारवाई करण्यात आली. या पाचही नक्षलींवर एकूण ३६ लाख रुपयांचं बक्षीस होतं.

****

हवामान खात्यानं पावसाबाबत वर्तवलेल्या अंदाजानुसार प्रत्येक विभागानं मान्सून कालावधीत आपली यंत्रणा सज्ज ठेवण्याचे निर्देश छत्रपती संभाजीनगरचे विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांनी दिले आहेत. मान्सूनपूर्व तयारीबाबतच्या विभागस्तरीय आढावा बैठकीत ते आज बोलत होते. आपत्तीच्या काळात नागरिकांना वेळेत मदत पोचवण्याच्या दृष्टीनंही नियोजन करण्याच्या सूचना गावडे यांनी दिल्या.

****